नि.दि. दा. क्र. ८३/२०१७
धोंडबाराव वि. गंभीरराव
CNR No.MHWS080010382017

**निशाणी क्र. १८ खालील आदेश**
**(पारित दिनांक १४.०८.२०२३)**

प्रतिवादींनी सदरचा अर्ज न्यायालयीन आयुक्त नेमण्याकरीता दाखल केला आहे. त्याच्या कथनानुसार, वादीने त्याच्या दाव्यामध्ये मौजे करडा ता. रिसोड येथील गट क्र. २३ मध्ये पाण्याची विहीर असल्याचे सांगितले. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, गट क्र. २३ मध्ये कोणतीही विहीर अस्तित्वात नाही. सत्य परिस्थिती न्यायालयासमोर अभिलेखावर आणण्याकरिता पाहणी करणेकरिता महसुल दप्तरीच्या संबंधीत अधिका–यांची आयुक्त नेमण्याची विनंती केली आहे.

**०२** याउलट वादीच्या वकीलांनी सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केले की, न्यायालयीन आयुक्त हे पुरावे गोळा करण्यासाठी नेमले जाऊ शकत नाही. सदरचा अर्ज कायदेशीर नसून केवळ प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने केलेला असल्याने नामंजूर करण्याची विनंती केली.

**०३** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा दिनांक १३.११.२०१७ रोजी दाखल केलेला आहे. त्याचदिवशी नि.क्र. ०५ वरील अर्ज सुध्दा दाखल केला होता. प्रतिवादींनी नि.क्र. ११ खाली दिनांक २८.११.२०१७ रोजी जवाब दावा दाखल केलेला आहे. दोन्ही पक्षांमधील वाद हा गट क्र. २३ आणि गट क्र. २५ मधील जमीन व विहीरीबाबत आहे. वादीच्या कथनानुसार, गट क्र. २३ मध्ये विहीर असून त्याबाबतचे दस्तऐवज दाखल केले आहेत. उलट प्रतिवादीच्या गट क्र. २५ मध्ये कोणतीही विहीर नाही. याउलट प्रतिवादीच्या कथनानुसार गट क्र. २३ मध्ये कोणतीही विहीर नसुन गट क्र. २५ मध्ये प्रतिवादींची विहीर आहे. त्या विहीरीवर वादीचा कुठलाही हक्क नाही. त्याबाबतचे दस्तऐवज प्रतिवादींनी दाखल केलेले आहेत.

**०४** दोन्ही पक्षांचे कथन बघता असे दिसुन येते की, प्रतिवादींनी सुध्दा गट क्र. २५ मध्ये त्याची जमिन सांगुन गट क.ृ २५ मध्ये विहीर असल्याचे कथन करुन प्रतिवादीच्या जमिनीला हरकत व अडथळा करु नये असा दिवाणी दावा क्रमांक ८६/२०१७ वादी विरुध्द दाखल केला असुन तो सुध्दा याच न्यायालयात प्रलंबित असुन आजच्या दैनंदिन सुचीवर आहे. दोन्ही पक्षांनी गट क्र. २३ व २५ मध्ये विहीर असल्याचे परस्परविरोधी दस्त दाखल केलेले आहेत. दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या दस्तऐवजांवर गट क्र. २३ मध्ये सुध्दा विहीर दर्शविली आहे आणि गट क्र. २५ मध्ये सुध्दा विहीर दर्शविली आहे. परंतु दोन्ही पक्ष केवळ एकच विहीर असल्याचे कथन करुन सदर विहीर केवळ त्यांच्या मालकीच्या गट क्रमांकात असल्याचे म्हणत आहेत.

**०५** त्यामुळे उपलब्ध दस्तऐवज जरी गट क्र. २३ आणि २५ मध्ये विहीर असल्याचे दर्शवित असले तरी दोन्ही पक्षांचे तोंडी कथन एकमेकांच्या परस्परविरोधी आहे. दोन्ही पक्षांच्या कथनानुसार गट क्र. २३ आणि २५ हा एकमेकांना लागुन आहे. दोन्ही पक्षांनी केवळ एकच विहीर असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांचे कथन आणि उपलब्ध दस्तऐवज यांच्यात विसंगती दिसुन येते. त्यामुळे दोन्ही गट क्रमांकात दोन वेगवेगळया विहीरी आहेत किंवा एकच विहीर आहे ही बाब प्रत्यक्ष वस्तुस्थिती व स्थळनिरीक्षण केल्या शिवाय अभिलेखावर येणार नाही. तसेच सदर स्थळ निरीक्षण झाल्यास दोन्ही पक्षांचा वाद कायमचा मिटू शकतो. तसेच विहीर कोणाच्या मालकीची आहे हे सिध्द करण्याची संधी दोन्ही पक्षांना मिळणारच आहे.

**०६** दोन्ही पक्षांचे कथन ऐकुन असे निदर्शनास येते की, न्यायालयीन आयुक्त नेमुण स्थळ निरीक्षण केल्यास दोन्ही पक्षाचा वाद कायमचा मिटू शकतो. त्यामुळे वाद जागेबाबतची वस्तुस्थिती व अचुकता विहीरी बाबतचे स्थळ निरिक्षण करुन न्यायालयासमोर आणणे गरजेचे दिसुन येते. त्यामुळे केवळ दोन्ही गटामध्ये विहीरीचे स्थळ परिक्षण अचुकतेने करणे म्हणजे पुरावे गोळा करणे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादी व प्रतिवादींमधील वाद, त्यांच्यात प्रलंबित दावे त्यातील मिळकतीचे स्वरुप बघता वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्याकरीता हा अर्ज मंजुर करणे याघडीला योग्य व न्याय वाटत असल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेखचे भुमापक तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, रिसोड यांना न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्ताने मौजे रिसोड येथील मौजे करडा येथील गट क्र. २३ व गट क्र. २५ मध्ये प्रत्येकी दोन स्वतंत्र विहीरी आहेत किंवा एकच विहीर आहे याबाबतचे स्थळ निरीक्षण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दोन महिन्याच्या आत न्यायालयास सादर करावा.

४. प्रतिवादींनी न्यायालयीन आयुक्ताच्या फिचा भरणा नियमानुसार करावा.

५. दोन्ही पक्षांनी न्यायालयीन आयुक्तांना सहकार्य करुन आपआपल्या गट क्रमांकातील जमीनीचे योग्य ते दस्तऐवज पुरवावे.

स्वा/–

(यो.द. कोईनकर)

दिनांकः १४.०८.२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 17.08.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 17.08.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.08.2022 |